# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE REACHING NATIONS

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXVI | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2024 JULY | No. 06


### पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

नीतिसूत्रे ९२:१-१०

१. परमेश्वराचें उपकारस्मरण करणें, हे परात्परा, तुझे नामसंकीर्तन करणे गोड आहे.

२. प्रभात समयी तुझे वात्सल्य प्रतिरात्री तुझी सत्यता वाखाणणें,

३. दशतंतुवाद्य; सतार व वीणा यांच्या साथीने गंभीर स्वरानें गाणे गोड आहे.

४. कारण तूं, हे परमेश्वरा, आपल्या कृतीने मला हर्षित केले आहे; तुझ्या हातच्या कृत्यांचा मी जयजयकार करितो.

५. हे परमेश्वरा, तुझी कृत्ये किती थोर आहेत! तुझे विचार फार गहन आहेत.

६. पशुवृत्तीचा मनुष्य हे जाणत नाही; मुर्खाला हे समजत नाही.

७. दुर्जन गवताप्रमाणें उद्भवले व सर्व दुष्कर्मी उत्कर्ष पावले, म्हणजे त्यांचा कायमचा विध्वंस ठरलाच म्हणून समजावे.

८. तूं तर, हे परमेश्वरा, सदासर्वकाळ उच्चस्थानी आहेस.

९. पाहा, हे परमेश्वरा; तुझे वैरी; तुझे वैरी नाश पावतील; सर्व दुष्कर्म्यांची दाणादाण होईल.

१०. माझे शिंग तर तूं गव्याच्या शिंगाप्रमाणे उन्नत केले आहे; मला ताज्या तेलाचा अभ्यंग झाला आहे.

# तुमच्या अभिषेकाचे संरक्षण करा

## PROTECT YOUR ANOINTING!

*मानद् प्रमुख संपादक, रेव्ह. ॲन्जेलीन सेल्वाकुमारी*



हे १६ भाषांमध्ये प्रत्येक महिन्यात प्रसिद्ध करण्यात येत असलेले मासिक प्रामाणिकपणे वाचीत असलेल्या आमच्या जगभरातील **एको ऑफ हिज कॉल** कुटुंबातील सभासदांस प्रभु आणि तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या नामात शुभेच्छा. "... **जो होता व येणार त्याजपासून.... तुम्हांस कृपा व शांति ही असोत.**" (प्रकटी १:४)

हे वचन सर्व परिस्थितीत मला फार मोठ्या प्रमाणात खात्री पुरविते; कि मला असा देव आहे ज्याला माझा भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य समजते; जो माझा साथी आणि मित्र म्हणून मजबरोबर चालतो. या खात्रीमुळे आंतरिक शांति द्वारे, **देवाने मजसाठी जगाच्या उत्पत्तिच्याहि अगोदर योजून ठेविलेल्या.** (इफिस २:१०) उद्याच्या अनिच्छिततेला सामोरे जाऊ शकते.

देवाने आपल्या प्रत्येकाची कशी गुंतागुतीने रचना केली, यावर मनन-विचार करीत असताना मला अशी जाणीव होते की, आपले आस्तित्व हा एक अपघात नसून ते देवाच्या योजनेचा एक भाग आहे. जरी एकाद्याने कदाचीत असा विश्वास ठेवला कि

(...पान ३ वर)



**एको ऑफ हिज कॉल** *पाच मिनिटांचा संदेश*

**यू ट्युब ख्रिश्चन चॅनल**

**पास्टर सॅम सेल्वा राज**

**यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी**


इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

Every day – From 2.00 A.M.

प्रतिदिनी - पहाटे पाच वाजता  रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

REACHING NATIONS



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
HON. MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM., MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Sis. L. Mariya Anjalin, M.A., M.Sc., B.Ed.
Rev. Dr. K.R. Rajasekaran

EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858
95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

### "...परमेश्वर तुम्हांवर प्रसन्न होण्यास विलंब लावील..." (यशया ३०:१८)

प्रभुमधील अति प्रियांनो,

आम्ही आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या अतुल्य नामात तुम्हां सर्वांना प्रेमळपणे शुभेच्छा देत आहोत!

प्रभु परमेश्वराच्या कृपेमुळे आम्ही २०२४-२०२५ या शैक्षणीक वर्षाकरिता आमची **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल** आणि आमचे **नहेम्या बायबल कॉलेज** सुरू करु शकलो. कृपया तुमच्या प्रार्थनांमध्ये या संस्थांना आधार द्या.

ज्यांना भविष्यात स्वंतत्रपणे परमेश्वराची सेवा करण्याची इच्छा आहे, त्यांना ईश्वर विज्ञान संस्थेशी सलग्न असणाऱ्या संस्थेच्या अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाण पत्र असणे आवश्यक असते हे सर्वांना ठाऊक आहे. या संबंधात आमचे **नहेम्या बायबल कॉलेज** तुम्हांस मदत करण्यास तयार आहे. सायंकालीन वर्ग तामिळ भाषेत घेतले जातात. ज्यांना हिन्दी भाषेत अभ्यासक्रम करावयाचा आहे. त्यांना आम्ही निवासी व्यवस्था देखील पुरवितो. इच्छुकांनी आमच्याशी संपर्क साधावा.

**नहेम्या बायबल कॉलेज**मधून पदवी संपादन केलेल्या आणि सध्या सेवा करीत असलेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांचे १३-०५-२०२४ रोजी सम्मेलन घेण्यात आले होते. २०२३-२०२४ या शैक्षणीक वर्षाचा पदवी समारंभ ०१-०६-२०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता पार पडला. एकूण ३८ विद्यार्थी पदवी प्राप्त करुन सेवेकरिता वेगवेगळ्या ठिकाणी गेले.

आम्हाला **नहेम्या बायबल कॉलेज**साठी तामिळ आणि हिन्दी भाषेत अभ्यासक्रमासाठी आणखीन विद्यार्थी हवे आहेत. देवाची सेवा करण्याची उत्कटत इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांची



*नहेम्या बायबल कॉलेजचे ॲल्युमिनी सभासद*



*शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ चा पदवीदान समारंभ*

आम्हाला ओळख करुन देण्यास मदत करा.

आम्हाला आमचे सेवाकार्य विशेष रितीने वाढविण्याकरिता मासिकाची आकर्षक रचना करणारे, लेखांचे भाषांतर करणारे भाषांतरकार, मुद्रणालयात सहायक म्हणून काम करणारे व तंत्रज्ञ वाहन चालक, सुरक्षा-रक्षक, संगणक चालक, डी.टी.पी. चालक, हायस्कूलसाठी शिक्षक, संदेश अनुवादक, मिशनरी, पूर्ण वेळ सहायक पास्टर इत्यादी. आम्हाला आमच्या सोबत सेवाकार्यातील सर्व विभागात कार्य करण्यास खरे दर्शन व प्रामाणिकता असणाऱ्या स्त्रीयांची व पुरुषांची गरज आहे. आमचे सेवाकार्य वाढत आहे. परंतु मदत करण्यास योग्य लोक मिळत नाहित. कृपया तुम्हाला जे काही करणे शक्य असेल त्याद्वारे आम्हास आधार द्या.

या आधुनिक समयात छापील साहित्य वाचणाऱ्या लोकांच्या प्रमाणात घट होत आहे. सर्वांना संगणकाशी जोडलेले वाचावयास आवडते. आमचे मागील ४०-५० वर्षांपासून **एको ऑफ हिज कॉल** मासिक वाचणारे वाचक आता वृद्ध झालेले आहेत. काहिंनी जीवन यात्रा संपविली आहे, तर काही वृद्धाश्रमात राहात आहेत. ते आमच्या सेवाकार्याकरिता प्रार्थना करीत असत व आर्थिक मदत करीत असत. पण आता आमच्या मासिकाच्या वाचनात घट होत आहे. तुमचे मित्र, नातेवाईक यांचे फोन नंबर आणि पत्ते पाठवून मदत करा. आम्हाला त्यांना मासिक विनामूल्य पाठविता येईल.

आमच्या विनंतीला तुमच्या उत्स्फुत प्रतिसादाची अपेक्षा करीत आहोत.

देवाची कृपा तुम्हा सर्वांसह राहो!

ख्रिस्त येशू मध्ये तुमचे दास.


**ॲलेक्स सॅमसन सॅम**

**पास्टर एस्. सॅम सेल्व राज**

(+91) 9841271858/9841071858

E-mail : sam@echoofhiscall.org


## त्याच्या बोलाविण्याचा प्रतिध्वनी मासिकाच्या वाचकांनो - लक्ष द्या

**एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनलवर आमचे ५ मिनिटांचे मननपर संदेश दररोज पहाटे २.०० वाजता तामिळ, तेलगू, इंग्रजी आणि हिन्दी या भाषांमध्ये प्रसारीत केले जात आहेत. संदेश ऐकून तुम्ही देवाची कृपा प्राप्त करु शकता.

आणखी माझे मोबाईल क्रमांक (+९१)९८४१०७१८५८, आणि (९१)९८४१२७१८५८ (वैयक्तिक) तुमच्या मोबाईलमध्ये जतन करुन ठेवा.

**- पास्टर एस्. सॅम सेल्वा राज**

(पान १ वरुन...)

त्याच्या जगीक पालकांना तो नको होता किंवा अनपेक्षित होता, तरी देखील स्तोत्र १३९:१३ या वचनानुसार **"तूच माझे अंतर्याम निर्माण केले; तूंच माझ्या आईच्या उदरी माझी घटना केली."** (देवाने प्रत्येकाला काळजीपूर्वक घडविले.) यामुळे आपली आपल्या विश्वासाचा उत्पादक पूर्ण करणाऱ्याच्या मार्गदर्शनाने त्याचा आपल्याला घडविण्यामागचा हेतु, शोधून तो पूर्ण करावा हि आपली जबाबदारी आहे.

देव आपल्याला दैवी पाचरण आणि दाने याची कृपा पुरवितो, ती आपल्या कर्तृत्वावर आधारित नाहि, तर त्याच्या स्वभावगुणामुळे. तरी देखील या मार्गापासून बहुतेकदा न कळत भटकून जाणे सहज शक्य असते, जो पर्यंत आपण इच्छिलेल्या मार्गापासून दूर गेलेलो आहोत हे आपल्याला समजते. धन्यवाद. देवू या, पवित्र आत्मा आम्हाला पुन: आपल्या प्रेमळ उद्धारकाच्या मार्गावर येण्यास मार्गदर्शनासाठी सदैव हजर असतो.

इस्त्राइलचा पहिला राजा शौल याच्या जीवनाच्या उदाहरणाद्वारे आपल्याला देवाच्या दैवी हेतु पासून दूर घेऊन जावू शकणाऱ्या काही सर्वसामान्य पायाऱ्यांचा शोध घेऊया.

**शौल :- याची सुरुवात महत्त्वाची नाहि, तर शेवट!**

इस्त्राएल लोकांनी जेव्हा राजांचा राजा त्यांचा राज्यकर्ता असण्यास नाकारुन राजाची मागणी केली; देवाने त्यांची इच्छा मान्य केली. किशाचा पुत्र शौल, जो बेंजामिनाच्या कुळांतील एक शौल. जो धनवान आणि चटकन मनात भरेल असा. देखणा, तो त्यांना राजा म्हणून दिला. शौलाकडे राजा होण्यासाठी जगीक सर्व गुण होते. १ शमुवेल ९:२ या वचनात त्याचे वर्णन, **"तो तरुण देखणा होता." "इस्त्राएल लोकांत त्याच्या इतका देखणा कोणी नव्हता; तो एवढा उंच होता की सर्व लोक त्याच्या केवळ खांद्याला लागत."** या अशा निवडलेल्या, गुणसंपन्न व्यक्तिची शोकान्तिका शेवट होण्याचे काय कारण?

### १ले चुकीचे पाऊल

### गर्व!

देवाने शौलाला राजा होण्याकरीता बोलाविले. त्याचवेळेस त्याजकडे आत्मविश्वासाची उणीव होती. त्याने असे ही म्हटले, **"इस्त्राएल वशांतले सर्वाहून कनिष्ठ जे बन्यामिनी त्यातला मी ना? आणि बन्यामिनाच्या वंशातील सगळ्या कुळांत माझे घराणे कनिष्ठ ना?"** (१ शमुवेल ९:२१). **"अभिषेक केला जाण्याच्या वेळी त्याने लाजून लपण्याचा प्रयत्न केला."** (१ शमुवेल १०:२२). आपण हे लक्षात ठेविले पाहिजे, देव आम्हाला जेथे त्याच्या कृपेचा आधार देवू शकत नाही अशावेळी पाचारण करणार नाही. इस्त्राएलाचा पहिला राजा होण्याकरीता देवाची कृपा पुरेशी होती. त्याच्या हलक्या दर्जाच्या सुरुवातीची पर्वा न कररिता देवाने त्याला आशीर्वाद दिला. तथापी, जसे त्याने यश अनुभविले आणि विजयावर विजय प्राप्त केले त्यामागोमाग

प्राप्त झालेली किर्ती, नावलौकीक आणि अफाट स्तुती यामुळे आपल्यापैकी अनेकांप्रमाणे त्याला देखील आंधळे केले.

१ शमुवेल अध्याय १५ मध्ये आपल्या समोर असाच उतारा पहावयास मिळतो ज्यामध्ये देव त्याला आज्ञा देत आहे. जाऊन अमालेक्यांचा सर्वस्वाचा विध्वंस कर, स्त्रिया व अर्भके, तान्ही बाळे या सर्वांचा संहार कर. याकडे वर्तमान परिस्थितीतून पाहिले तर देवाचे चित्र तो एक क्रुर, निष्ठुर आणि सूड घेणारा असे उभे राहाते. तथापि, इस्त्राएलाचा इतिहासाचा विचार केला, तर पहावयास मिळते कि अमालेक्यांनी इस्त्राएलांना यातना दिल्या, त्या दुबळ्या थकलेल्या अशांचा सहज नाश करता येईल अशाप्रकारे त्यांच्यावर हल्ला केला.

**सावध रहा!**

बायबल जखऱ्या २:८ असे नमूद करते, **"जो कोणी तुम्हांस स्पर्श करील तो त्याच्या डोळ्याच्या बुबुळालाच स्पर्श करील."**

देव ज्या लोकांना स्वत:चे लोक त्याची मालमत्ता समजत होता, त्यांना अमालेक्यांनी ज्या प्रकारे वागणूक दिली, त्यामुळे दुखावला होता आणि त्यांचा सूड घेण्याचे ठरविले. आपल्याला असा देव आहे, जो आपल्या करिता आपले युद्ध लढतो हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. तथापी शौलाच्या गोष्टित आपल्याला एक वेगळा प्रतिसाद पहावयास मिळतो. शमुवेलाने त्याच्या कृतिबद्दल कानउघडणी केली, त्याची चुक दाखविली, तत्काळ शौलाची प्रतिक्रिया कबूलीची आणि पश्चातापाची असावयास हवी होती, उलट तो शमुवेलास म्हणतो, **"इस्त्राएलासमोर माझा मान राखा व मजबरोबर परत या म्हणजे मी परमेश्वराची उपासना करीन."** (१ शमुवेल १५:३०) येथे **शौलाची नम्रता गर्वामध्ये बदलल्याचा पुरावा पहावयास मिळतो, स्वत:स मान्यता आणि स्वत:कडे मान घेतो.** (१ शमुवेल १५:१२).

यश आणि विजय बहुतेकदा विचारात आणि प्रवृत्तित बदल घडवून आणू शकतात. शौलाचा एक विनम्र व्यक्तिमधून मान-सन्मान शोधणाऱ्या व्यक्तित झालेला बदल हा गर्वाचा धोका प्रदर्शीत करतो.

ज्या क्षणी गर्व ताबा घेतो; **देव कदाचीत आपल्या जीवनातून त्याची उपस्थिती काढून घेईल आणि आपल्या विरोधात देखील उभा राहिल.** (यशया ६३:१०). याकोब ४:६ हे वचन आपल्याला ताकीद देते, **"देव गर्विष्ठांचा विरोध करितो; आणि लिनास कृपादान देतो."** आपण आपल्या शब्दांवर आणि कृतिवर पूर्णपणे विचार करावा अशी सावध रहाण्याची आठवण हे वचन करुन देत आहे. आपण किती वेळा "हे माझे घर", "माझे जीवन" किंवा "मला उत्तम कळते" असे शब्द उच्चारुन मालकी हक्क बजावतो? आपण जरी बाह्यरित्या नम्रता दर्शविली, तरी जेव्हा आपल्या अहंकारास आवाहन केले जाते त्यावेळी आपली खरी स्वभाववृत्ती प्रकट होते. "तुम्हाला माहित आहे कां, मी कोण आहे?" किंवा "तुम्ही मजशी अशा प्रकारे बोलण्याची हिंमत कशी करता?" असे बोलून आपले महत्त्व-मोठेपण दाखविण्याचा प्रयत्न करितो अशावेळी नकळत ती दिसून येते.

हि सावधगीरीची गोष्ट, आपण अहंकाराच्या खाचखळग्यांपासून, विशेषता: आपली मन:स्थिती आपल्याला इशारा देत असते. मग ते व्यक्तिद्वारे बोलले गेलेले असो किंवा जे उघडपणे विश्वास सांगतात त्यांच्या कानात ध्वनीत झाले की "तुम्हाला ठाऊक आहे की मी कोण आहे?" अशानी ती आंतरिक अहंकाराच्या स्वभावास ताकीद आहे असे समजावे.

## २रे चुकीचे पाऊल

## स्वत:ची फसवणूक!

१) प्रत्यक्षात ते तसे नसताना देखील तसे आहोत असे समजतात.

२) आहे त्यापेक्षा आपल्याकडे अधीक आहे असे समजतात.

३) खरे अस्सल किंवा विश्वसनीय आहोत अशी इच्छा बाळगण्या ऐवजी, नाहीत तसे स्वत:स प्रदर्शीत करण्याची इच्छा बाळगतात.

आता या संबंधात बायबल काय म्हणते ते पाहूया :-

**"...मी अधिक आहे अशी बढाई करु नको..."** (रोम ११:१८)

(...पान ६ वर)


# निवासी बायबल कोर्स
## नेहम्या बायबल कॉलेज, चेन्नाई

माध्यम : हिंदी

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE REACHING NATIONS

आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५४ वर्षांपासून मान्यता प्राप्त

प्रवेशा करिता त्वरा करा!

## ईश्वरविद्या डिप्लोमा

शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक

संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

* ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे *

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ जुलै ते १८ ऑगस्ट २०२४ पर्यंत

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✞ याकरीता देवाची स्तुती करा...

१९ जुलै : आमच्या सर्व सहसंपादक आणि त्यांच्या कुटुंबियांना आशीर्वादीत केले.

२० जुलै : १९६९ सालापासून आमच्या मासिक प्रसिद्ध करण्याच्या सेवेवर विपुल आशीर्वाद देत आल्या बद्दल.

२१ जुलै : आमच्या मुख्य आणि सर्व शाखा मंडळ्यांच्या पाळकांवर असलेल्या त्याच्या आशीर्वादा बद्दल.

२२ जुलै : आमचे मुद्रणालय कुशल कारागीरांद्वारे सतत कार्यरत आहे.

२३ जुलै : बालाजी नगर, संतोषपुरम आणि वेलाचरी येथील उपासनांत नवीन विश्वासणाऱ्यांच्या सहभागाबद्दल.

२४ जुलै : आमची '**ग्लोबल व्हिजन फॉर युथ ॲण्ड किडस्**' सेवेवरील त्याच्या आशीर्वादा बद्दल.

२५ जुलै : **नहेम्या बायबल कॉलेज** आणि **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल**चे २०२३-२०२४ हे शैक्षणिक वर्ष आशीर्वादीत केले.

२६ जुलै : मिशन क्षेत्रातील सेवकांच्या समर्पित जबाबदारी बद्दल.

२७ जुलै : **नहेम्या बायबल कॉलेज**साठी निवासी आणि सायंकालीन अभ्यासक्रमासाठी नवीन विद्यार्थी मिळण्यास मदत केल्याबद्दल.

२८ जुलै : शुभवर्तमान न पोहचलेल्या लोकांपर्यंत ते यूट्युबच्या माध्यमाद्वारे पांच मिनिटांचा संदेश प्रसारीत करणे आशीर्वादीत करीत आहे.

२९ जुलै : शुभवर्तमान दुर्गम भागात पोहचविण्यासाठी आशीर्वाद देत आहे.

३० जुलै : आमच्या प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार आणि महान आज्ञापालनांतील भागीदारांवरील दयेबद्दल.

३१ जुलै : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल, नहेम्या बायबल कॉलेज** आणि **थियॉलॉजीकल अभ्यासक्रमा** बद्दल.

०१ ऑगस्ट : मुख्य मंडळीत अधीक नवीन विश्वासणारे देवून आशीर्वादित केले.

०२ ऑगस्ट : आमच्या मंडळ्यांच्या पाळकांबद्दल आणि स्वयंसेवकांबद्दल.

०३ ऑगस्ट : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल** करिता आणखीन समर्पित असे ख्रिस्ती शिक्षक आणि प्रिन्सिपल देवून आशीर्वादित केल्याबद्दल.

## ✞ कृपया यासाठी प्रार्थना करा...

०४ ऑगस्ट : आमचे वरिष्ठ पाळक, पास्टर एस्. सॅम सेल्वाराज आणि त्याच्या कुटुंबाचे सर्व प्रकारच्या दुष्ट शक्तिंपासून रक्षण व्हावे.

०५ ऑगस्ट : जगभरातील लोकांच्या सर्व गरजांकरिता.

०६ ऑगस्ट : आमच्या सेवा कार्यातील सर्व गरजा पुरविल्या जाव्यात.

०७ ऑगस्ट : आमच्या सर्व स्टाफ आणि त्यांच्या कुटुंबाच्या प्रकृती स्वास्थाकरिता.

०८ ऑगस्ट : जगभरातील आर्थिक मंदी संपुष्टात यावी.

०९ ऑगस्ट : दररोज पहाटे २.०० वाजता यूट्युब चॅनलवरुन पांच मिनिटें प्रसारीत होत असलेल्या संदेश सेवे करिता.

१० ऑगस्ट : आज **एको ऑफ हिज कॉल** सेवाकार्य ५६व्या वर्षात पदार्पण करीत आहे.

११ ऑगस्ट : देवाची लेकरें आत्मिक आणि भौतिक रित्या आशीर्वादीत व्हावी.

१२ ऑगस्ट : सुटीतील शास्त्राभ्यास शाळेत (VBS) ज्या ज्या लेकरांनी येशूच्या प्रेमाचा स्पर्श अनुभविला त्यांनी त्यात टिकून रहावे आणि मंडळीच्या उपासनांना नियमित हजर रहावे.

१३ ऑगस्ट : देवाच्या सेवकांच्या आणि मिशनऱ्यांच्या विरुद्ध होणारा उद्रेक थांबावा.

१४ ऑगस्ट : देवाच्या कृपेचा वर्षाव परत एकवार लोकांवर व्हावा.

१५ ऑगस्ट : कुटुंबात विभाजन घडविणाऱ्या सैतानाच्या कृत्यांचा नाश व्हावा.

१६ ऑगस्ट : जगात दिर्घकालीन व्याधी आणि नैराशेत असलेल्या लोकांची त्यातून मुक्तता व्हावी.

१७ ऑगस्ट : या महिन्यातील आर्थिक गरजांची पूर्तता व्हावी.

१८ ऑगस्ट : जगभरात घेण्यात आलेल्या (VBS) सुटीतील शास्त्राभ्यास शाळेत तारण पावलेल्या तरुणांसाठी आणि लेकरांसाठी.

(पान ४ वरुन)

**स्वत:ला अधिक मानू नका...''** (रोम १२:३)

**"...तुझ्या मनाच्या अभिमानानें तुला दगा दिला आहे..."** (ओबाद्या ३)

हा नमुना शौलाच्या जीवनात पुरावा दिसून येतो; त्याच्या अहंकाराने त्याला आंधळे केले आणि फसविले व स्वत:ची फसवणूक करण्याकडे नेले.

आपण स्वत:; स्वत:च्या फसवणूकीच्या जाळ्यात कसे सापडतो आणि परिणाम काय होता:-

## अ) देवाची आज्ञापूर्णपणे मानण्यास तयार नसतो!!

उदा. देवाने शौलास आज्ञापिले, **"आता जाऊन आमालेकास मार दे; त्याच्या सर्वस्व:चा विध्वंस कर."** (१ शमुवेल १५:३) तथापि **"जे जे काही चांगले होते ते राखून ठेवून"** स्वत:ची फसवणूक केली. (१ शमुवेल १५:९). हे राखून ठेवण्यास योग्य आहे. त्याचा निर्णय त्याने स्वत:नेच घेऊन तो योग्य आहे अशी समजुत करून घेऊन स्वत:ची फसवणूक केली. त्याने **"मी परमेश्वराची आज्ञा पाळली आहे"** असा दावा देखील केला. (१ शमुवेल १५:१३) जरी देवाने दिलेल्या सुचना न पाळून देखील.

शौलाप्रमाणे अनेकदा आपण देखील आपण केलेली कृति देवाच्या इच्छेनुसार केलेली आहे असा विश्वास बाळगतो;



*Samuel reprimands Saul for disobeying God's Command*

तरी प्रत्यक्षात आपण त्यात कमी पडलेलो असतो. देवाच्या इच्छेनुसार केलेल्या कृतिनेच त्याला संतोष होतो. परंतु स्वत:ची फसवणूक आपण त्यात कमी पडलेलो असतो. देवाच्या इच्छेनुसार केलेल्या कृतिनेच त्याला संतोष होतो. परंतु स्वत:ची फसवणूक आपला निर्णय ढगाळतो.

## ब) स्वत:ची चुक कबुल करण्यास तयार नसतो

गर्व... अहंकार आणि लबाडी यांनी त्याचे डोळे आंधळे, हृदय बधीर, आणि कान बहिरे केले, देवाची वाणी ऐकण्यास अडखळण झाले. त्याने लोकांनी ती



*Saul tries to justify disobedience in a spiritual way*

अमालेक्यांपासून आणिली आहेत; आपला देव परमेश्वर याच्या प्रित्यर्थ बलि अर्पण करण्यासाठी त्यांनी उत्तम उत्तम मेंढरे व गुरे राखून ठेविली आहेत. असे म्हणून लोकांवर आरोप केला. शौल येथे त्याच्या आज्ञा न पाळणे यास आत्मिक स्वरुप देण्याचा प्रयत्न करीत आहे. यामुळेच देव होम आणि यज्ञांपेक्षा आज्ञा पालनावर भर देतो. लबाडी फसवणूक आपल्याला स्वत: केलेल्या कृतिची जबाबदारी स्विकारण्या ऐवजी इतरांवर आरोप करण्यास प्रवृत्त करिते.

## क) नम्रता स्विकारण्यास तयार नसते

शौल त्याच्या अहंकाराच्या शिखरावर होता.

✲ त्याने स्वत:करिता स्मारक उभारले.

✲ शमुवेलाने त्याचा मान राखावा असा आग्रह धरीला.

✲ देवाच्या मान्यते ऐवजी लोकांकडून मान राखला जाणे त्याने अपेक्षिले.

✲ देवा समोर नम्र होऊन क्षमा मागण्या ऐवजी लोकांसमोर त्याचा मान राखला जावा अशी इच्छा व्यक्त केली.

अगोदर नमूद केल्यानुसार आपल्या सर्व कृत्यांना परिणाम असतो. अर्धवट आज्ञापालन हे पूर्णपणे आज्ञा मोडण्यासारखेच - तितक्याच मोलाचे असते.

✲ शौलाने त्याच्या कृत्यांद्वारे देवाला दु:ख दिले.

✲ परिणामी देवाला त्याला ताबडतोब काढून टाकावे लागले.

✲ त्याला राजा केल्याचा देव आणि शमुवेल अशा दोघांनाहि दु:ख झाले.

तो देवाच्या इच्छेपासून भटकला आणि मार्ग चुकला. आपणापैकी एक देखील

(...पान ८ वर)


# नहेम्या बाईबल निवासी कॉलेज

वेलाचेरी आणि चेपॉक संतोषपुरम

माध्यम : तमिळ

आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ठ पाळकांद्वारे ५४ वर्षांपासून मान्यता प्राप्त

प्रवेश करिता त्वरा करा!

## ईश्वरविद्या डिप्लोमा

शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक

संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

## कृपया आमच्या मुख्यालयातील सेवाकार्याकरिता प्रार्थना करा

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. बायबलकोर : पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम : इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी
३. एको ऑफ हिज कॉल : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
४. नहेम्या बायबल कॉलेज (दोन केंद्र) (सायंकालीन / निवासी)
५. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
६. महान आजापालनाचे भागीदार (पाळकांचे नेटवर्क)
७. प्रशिक्षण कार्यक्रम
८. महासभा
९. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
१०. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
११. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१२. शब्बाथ शाळा : सकाळी ८.३० आणि सायंकाळी ४ वाजता - रविवारी
**१३. तामिळ उपासना : सकाळी ८.०० आणि १०,०० वाजता - रविवारी**
**१४. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**१५. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**१६. इंग्रजी आणि तामिळ उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
१७. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
१८. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
१९. शिष्यत्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२०. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२१. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२२. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार
२३. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
२४. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शुक्रवार
२५. उपास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शनिवार
२६. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
२७. सकाळचे मनन : पहाटे ५ वाजता - दररोज
२८. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
२९. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुवार्तिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्टला** भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST |
| Account Number | : | 1023 2923 805 |
| Bank Name | : | STATE BANK OF INDIA |
| Branch | : | TRIPLICANE, CHENNAI - 600 005 |
| IFSC Code | : | SBIN 0000249 |
| SWIFT Code | : | SBI NIN BB 455 |



# खड्ड्यातून महालापर्यंत

# PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## देव आपल्या छोट्या प्रयत्नांचा सन्मान करिते!

**''परमेश्वराचें उपकार स्मरण करा, ज्याने आमच्या दैन्यावस्थेत आमची आठवण केली त्यांचे; कारण त्याची दया सनातन आहे.''स्तोत्र १३६:१,२३**

मला देवाने माझ्या सेवेच्या अगदी सुरुवाती पासूनच देवाच्या गौरवार्थ त्याच्या राज्याच्या वाढीकरिता कोणत्याही तात्काळ मोबदल्याची अपेक्षा न करिता कोणत्याहि प्रकारच्या आवाहनांचा स्विकार करणारे मन दिले. १९७६ ते १९८६ या काळात मला माझ्या शासकीय कार्यालयात रजेचा अर्ज देवून भारतातील निरनिराळ्या भागात स्वत:च्या खर्चाने भेट देऊन सुवार्ता संदेश देण्याची सवय होती.

देवाने मला माझ्या आध्यात्मिक मित्रांना कमीत कमी एक किंवा दोन महिन्यांसाठी निरनिराळ्या शुभवर्तमान पोहचलेल्या खेड्यांत जाऊन हजारो लोकांना येशू ख्रिस्ताच्या सुवार्ता संदेशाद्वारे स्पर्श करण्यास मदत केली. अनेकदा मला स्वत:चे आणि सोबत येणाऱ्या मित्रांच्या प्रवास खर्चासाठी हॉटेलात राहाण्याकरिता खर्च करण्यासाठी देवावर अवलंबून रहावे लागत असे अशा सर्व प्रसंगी देवाने मला चमत्कारिक रित्या मदत केली.

या सेवेद्वारे देवाने मला चेनगलपेट, विल्लुपुरम, मदुराई, त्रिची, कन्याकुमारी या सर्व जिल्ह्यातील दुर्गम भागांना, तसेच कोडाईकॅनल, उटकमंड, त्रिवेंद्रम, पीलामेदु, इडुक्की, वेंनदीपेरीयार, विजयवाडा, बेंगलोर, मैसूर इत्यादी शहरांना भेटी देण्यास मदत केली. माझ्या या फेऱ्यांमध्ये वाद्ये, सुवार्ता हस्तपत्रिका एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी बसने किंवा ट्रेनने सोबत घेऊन जात असताना वेगवेगळ्या प्रकारे शारिरीक त्रासाचा अनुभव आला. माझ्या कमकुवत आर्थिक स्थितीमुळे, मी सेवे करीता एखादे वाहान असावे याचा विचार देखील करु शकत नव्हतो. तथापी देवाचे माझ्या वर्तणूकीकडे आणि साक्षीकडे लक्ष होते. ''**तुमचे कार्य आणि तुम्ही पवित्र जनांची केलेली व करीत असलेली सेवा, यावरुन जी प्रीति तुम्ही त्याच्या नामावर दाखविली तीहि देवाने विसरावी असा तो अन्यायी नाही.**'' (इब्री ६:१०)

कालांतराने मला माझ्या सोबत जे मित्र होते त्या सर्वांना देवाने आशीर्वादीत केलेले आणि उच्च पातळीवर नेऊन त्याचा त्याच्या द्राक्षमळ्यात मोठ्या सामर्थ्यानिशी आज देखील उपयोग करुन घेत आहे. असे पहावयास मिळाले. मला देखील देवाने आधुनिक साधने, कार, व्हॅन आणि आविशी सहकारी पुरवून आशीर्वादीत केले आणि तारण न पावलेल्या भारतातील लोकांपर्यंत तारणाची सुवार्ता घेऊन जाण्यासाठी आणखीन सहकारी पुरवीत आहे. त्याशिवाय त्याने मला जगातील विविध देशात नेले आणि अनेक मित्र देऊन सन्मानित केले.

तोच देव आजही जीवंत आहे आणि कोणताहि ताबडतोब मोबदला मिळण्याची, मोठ्या पदाची अपेक्षा न करिता त्याच्या सेवेकरिता पुढे येऊ इच्छिणाऱ्या नितीभ्रष्ट नसलेल्या अशा लोकांना शोधीत आहे. ''**आपले अन्न जलाशयावर सोड; ते बहुत दिवसांनी तुझ्या हाती येईल.**'' (उपदेशक ११:१) तो कोणाचाहि ऋणी नाही.

वैयक्तिक रित्या मी शिकलो आहे, जर मला देवराज्यासाठी काही करावयाची इच्छा असली, तर वाऱ्याची दिशा, ढगांचा रंग न पाहाता ताबडतोब करावे. कारण जो वारा पाहत बसतो तो पेरणी करणार नाही; जो मेघांचा रंग पाहत बसतो तो कापणी करणार नाही. (उपदेशक ११:४) जग आणि जगीक लोक तुमच्या सोबत उभे राहतील.

हल्लीच्या दिवसात, आपल्या लोकांना त्यांची प्रकृति, पैसा आणि कला देवराजाच्या वाढीकरीता खर्च करण्याची इच्छा नाहि; उलट त्यांची ताबडतोब बढती, जागच्या जागी मोबदला मिळण्याची अपेक्षा असते. प्रिय मित्रा, मी येशू ख्रिस्ताच्या शुभवर्तमानामुळे आशीर्वादीत आहे. तो तुम्हाला आशीर्वाद देवू शकतो. तुम्ही येशू ख्रिस्तासाठी आता काहीतरी करण्यास पुढे येऊ शकता कां? तुमचा क्रुस घेऊन त्याला अनुसरु शकता कां? देव त्याचे गौरवी शुभवर्तमान कितीही कोणत्याही मार्गांनी कोणतीही किंमत देऊन पुढे घेऊन जाऊ इच्छिणाऱ्या व्यक्तिंच्या शोधात आहे. (१ करिंथ ९:२२)

**वचन वाचत असताना, देवाची तुमच्या विषयी विशेष अशी योजना आहे हे तुम्हाला कळले पाहिजे! जगीक स्वास्थ्य, धन, नातेसंबंध, एक दिवस तुम्हाला फसवतील!! परंतु येशू ख्रिस्त तुम्हाला अनाथ असे सोडणार नाही. (योहान १४:१८) आजच निर्णय घ्या. मोठा मोबदला तुमची वाट पाहात आहे!**

~~~~~~
~~~~~~

(पान ६ वरुन)

शौलाप्रमाणे आपल्या जीवना विषयी असलेल्या देवाच्या उद्देशापासून दूर न जावे अशी प्रार्थना करु या.

## तिसरे आणि अंतीम पाऊल :

## कांड!

शौलाच्या अहंकाराने फसवणूकीकडे वळविले आणि स्वत:ची खोटी ओळख आणि पुढे बंड प्रवृत्ती आणि हट्टी स्वभाव कारणीभूत झाला. बंड हे अवज्ञा आणि दुराग्रह किंवा हट्ट याला समानार्थी शब्द आहे आणि ते सोबत परिणाम घेऊन असतात. नीतिसूत्रे २९:१ पुष्कळदा वार्ग्डेड झाला असूनहि **“जो आपली मान ताठ करितो त्याचा अचानक चुराडा होतो, त्याचा काही उपाय चालत नाही.”** अशी सुचना देतो.

शौलाला जाणीव नव्हती, कि त्याच्या बंडखोर प्रवृत्तीचा प्रभाव केवळ त्याच्या स्वत:वरच केवळ तर पुढील पिढ्यांवर जी बंडखेर प्रवृत्ती त्याने शमुवेलाची वाट न पाहता याजकाचा अर्पण करण्याचा राखून ठेविलेला अधिकार स्वत: प्रदर्शीत केला. ताकीद दिलेली असताना देखील तो ताठ मानेचा राहिला. आणि स्वत:चे राजपद गमावून बसला. अवज्ञेची आणि बंडखोरीची प्रत्येक कृतिला तिचा परिणाम असतो.

बंडखोरी कोणाच्या तरी अधिकाराच्या आधीन होण्यास, अधीकाऱ्याच्या अधीन राहाण्याला महत्त्व न देण्याचा परिणाम ओढवून घेते. आपल्या कुटुंबाअंतर्गत, आपण आपले आई-वडील, पती-पत्नी, वडीलधारी, व्यवस्थापक, मंडळीचे पुढारी, पाळक, निरीक्षक आणि सर्वाधिक महत्त्वाचे म्हणजे देवाच्या अधीन राहिले पाहिजे.

बंड हे केवळ वर्तणूकीचा भाग नाहि तर ते हृदयाचा भाग आहे; जे आपल्यामध्ये होण्याची आवश्यकता दर्शविते.

बंडखोरी संबंधात बायबल आम्हाला मुल्यवान धडे शिकविते :-

✻ अवज्ञा-बंड हे जादुगिराच्या पालकाशी जोडलेले आहे, ज्याचा देवाला तिरस्कार आहे. (१ शमुवेल २५:२३)

✻ देव त्याच्या पासून केवळ दूरच होत नाहि, तर त्याच्याशी लढतो देखील. (यशया ६३:१०)

✻ देवाचा हात आपल्या विरुद्ध काम करतो. (१ शमुवेल १२:१४,१५)

✻ पच्छाताप न करण्यात अपयश येणे. देवाला देहाचा स्वभावाचा नाश करण्याकडे नेऊ शकते. (१ करिंथा ५:५)

प्रिय मित्रांनो, आपले अंत:करण जर कठीण झालेले, बदलण्यास विरोध दर्शविणारे, पूर्णपणे उष्णता रहित असे असेल तर आपण त्यात बदल घडण्यास देवाची मदत घेतली पाहिजे. वचन आम्हांस आठवण करुन देते. **“शेवटपर्यंत जो टिकेल तोच तरेल.”** (मत्तय २४:१३). देवाचे पाचारण आणि दाने रद्द न करण्यासारखी असताना, आपण आपल्यामध्ये असणाऱ्या अहंकार, लबाडी-फसवणूक, बंडखोरी आणि देवाच्या योजनेपासून भटकणे याद्वारे आपण पवित्र आत्म्याला अडखळण करु शकतो आणि अपयशाचा प्रभावाकडे जाऊ शकतो. स्वत:स गर्व-अहंकार, विध्वंसक परिणाम या पासून सुरक्षित राखू या आणि आपणास जीवनाच्या उद्देशापासून वळविणाऱ्या चुका ओळखून; त्या दुरुस्त करु या. आपण देवाच्या इच्छेच्या मांडणीत असावे यासाठी स्वत:चे जीवन पडताळून पाहाण्यासाठी वेळ देणे हे अतिशय महत्त्वाचे आहे.

*************


## नहेम्या बायबल कॉलेजच्या तातडीच्या गरजा

*देवाच्या सेवेकरिता एक वर्षाचे प्रशिक्षण घेऊ इच्छिणारे :-*

१) **विद्यार्थी (पुरुष आणि स्त्रिया) सायंकालीन कॉलेजमध्ये तामिळ भाषेत आभ्यास करण्याची इच्छा असलेले.**

२) **कॉलेजच्या निवासात राहून हिन्दी भाषेत बायबल अभ्यासक्रम करु इच्छिणारे.**

संपर्क मो. नं. ९८४१२७१८५८

**पिक पुष्कळ आहे; परंतु कामकरी थोडे आहेत.**

**कृपया आम्हाला मदत करण्यास पुढे या.**

## कार्यालय

**संगणक चालक / मंडळीच्या कार्यालयाकरिता संगणक टंक लिपीक (Computer Typists) योग्य वेतन देण्यात येईल.**

संपर्क मो. नं. ९८४१२७१८५८


## वाचकांनो लक्ष द्या!

## पास्टर एस्. सॅम सेल्वा राज यांची आत्मचरित्र

पास्टर एस्. सॅम सेल्वा राज यांच्या आत्मचरित्र पुस्तक स्वरूपात छापण्याच्या अंतिम टप्प्यात आहोत. **त्यांच्या सेवेचा तुमच्या जीवनावर कसा प्रभाव पडला याविषयी आम्ही तुमच्याकडून दहा ओळींची साक्ष अपेक्षित आहोत. त्यासोबत आत्मचरित्रात तुमचा फोटो छापण्यात आम्हाला आवडेल.**

**- संपादक**

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

**ECHO OF HIS CALL Ministries**
**56th ANNIVERSARY (1969 - 2024)**

Gospel Crusades

09.08.2024, Friday
10.08.2024, Saturday
11.08.2024, Sunday
Time : 6.00 P.M.

Place:
**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET,
CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
98412 71858 **Please Pray!**

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

| | | |
|---|---|---|
| Branch | : | Triplicane, Chennai-5 |
| Name | : | S. Sam Selva Raj |
| A/C No. | : | 1023 2934 679 |
| IFSC | : | SBIN 00 00 249 |
| SWIFT CODE | : | SBI NIN BB 455 |

### *2. Bank : ICICI Bank*

| | | |
|---|---|---|
| Branch | : | Anna Salai, Chennai-6 |
| Name | : | Echo of His Call |
| A/C No. | : | 6038 0502 2319 |
| IFSC | : | ICIC 000 6038 |

### *3. Bank : State Bank of India*

(This Account is for Tax Exemption for Indians only )

| | | |
|---|---|---|
| Branch | : | Triplicane, Chennai-5 |
| Name | : | Echo of His Call Educational Trust |
| A/C No. | : | 1023 2923 805 |
| IFSC | : | SBIN 00 00 249 |

Google Pay: 98410 71858
PayPal : SAM SELVA RAJ
*****
E.mail : sam@echoofhiscall.org

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-  आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852,
95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th JULY 2024**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

***JESUS LOVES YOU!***

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**